नमस्कार... जय गजानन मित्रहो...!!!

असंच महाराजांच्या आठवणीत बसलेलो असताना महाराजांनीच लिहून घेतलेली, सुचवलेली एक कविता...

माझं आणि समर्थांचं;
नातंच वेगळं आहे,
मी यांचा भक्त,
आणि हेच माझं सगळं आहे...

हेच माझे आई-बाप;
मी तर ह्यांचाच हो बाळ,
महाराहांराजांचाच सहवास,
हेच माझ्या कर्माचं फळ...

इथं कोणीही नाही रिक्त;
होतील सगळेच मुक्त,
अहो यासाठीच तर आहे;
हे शेगांवीचे तख्त...

आपल्या सर्वांचं तर;
एकच आहे रक्त,
का की आपण तर;
सगळेच गजानन भक्त...

सदा सर्वदा एकचि मागावे;
सत्कर्म योगे वय घालवावे,
चरणी तुझ्या मी सदा राहावे,
सदा सर्वदा तुला आठवावे...

नित्य सदा मी;
फक्त तुलाचि भेटावे,
तुझ्याच सोबतीमध्ये पुन्हा;
मी मलाचि खेटावे...

तुझ्याच सोहळ्यांसाठी;
मी सदा नटावे,
आयुष्याचे हे पुण्यवृक्ष;
तुझ्याच पायाशी वटावे...

आपल्या अभंगांमध्ये मी;
नेहमी मलाच शोधतो,
माझ्या ताल-सुरांद्वारे;
पुन्हा तुम्हालाच वेधतो...
कधी तर काही जण चिडतात सुद्धा;
म्हणतात, काय हे असभ्य बोलणं??
त्यांच्या भक्तांचं हे अरे-तुरेचं बोलणं;
अहो हे तर मायलेकराचं; ते नातंच देखणं...

जय गजानन...!
श्री गजानन...!!

- रोहित माने, माले.